# बृहन्मुंबई महानगरपालिका
# देवनार पशुवधगृह
## लघुदरपत्रिका सुचना

महापालिका आयुक्त , बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी खालील दिलेल्या कामासाठी सील बंद दरपत्रिका त्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिकाकडून / कंत्राटदाराकडून दरपत्रिकेसोबत दिलेल्या नकाशा, कामाचे वर्णन, प्रारुप दरपत्रिका, तसेच दिलेल्या अटी व शर्तीवर मागविण्याचे ठरविलेले आहे.

| अ क्र. | कामाचा तपशील | ईसारा अनामत रक्कम | दरपत्रिका शुल्क | कंत्राटदारांच्या आवश्यक अर्हता | नियत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | देवनार पशुवधगृहातील बकरी ईद 2025 व्यवस्थापन करिता गुरे-ढोरे वध गृहाच्या नाळयाचा बाजुला व गुरेढोर प्रवेश च्या बाजुला संरक्षक लोखंडी रेलींग बनवुन बसविणेबाबत. | रु.6000/- | रु.330/- + 18% GST | अ) कंत्राटदार बृहन्मुंबई महानगरपालिकेचा नोंदणीकृत विक्रेता/कंत्राटदार असणे आवश्यक आहे.<br>ब) महापालिकेत अशा प्रकारच्या कामाचा पुर्वानुभव असणे आवश्यक आहे.<br>क) तसेच संबंधित विभागाकडुन काम समाधानकारक पुर्ण केल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.<br>ड) वरिल अ, ब व क पुष्ट्यर्थ संबंधित कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. | 30.05.2025 |

वर उल्लेख केल्याप्रमाणे दरपत्रिकेचे शुल्क अधिक 18 टक्के GST म.न.पा.च्या नागरी सुविधा केंद्रामध्ये भरल्यानंतर महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय दुसरा मजला गोवंडी मुंबई-400043 या ठिकाणी नियत दिनांक दिवशी दु.12.00 पर्यंत कोणत्याही दिवशी साप्ता. सुट्टी तसेच सार्वजनिक सुट्टी सोडून सोमवार ते शुक्रवारी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत उपलब्ध होतील. दरपत्रिकेचे शुल्क भरुन त्याची पावती नमुना दरपत्रिका घेण्यासाठी सोबत सादर करावी.

तसेच ईसारा अनामत रक्कम नियत दिनांका दिवशी दु. 12.00 पर्यंत कोणत्याही दिवशी साप्ता. सुट्टी तसेच सार्वजनिक सुट्टी सोडून सोमवार ते शुक्रवारी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत म.न.पा.च्या नागरी सुविधा केंद्रामध्ये येथे भरुन त्याच्या पावतीची छायांकित प्रत दरपत्रिकेच्या सील बंद लखोट्यावरती चिटकविण्यात यावी. ईसारा अनामत रक्कम फक्त डी.डी किंवा रोख रक्कमेद्वारे स्विकारण्यात येईल. चेक स्विकारण्यात येणार नाहीत.

सील बंद दरपत्रिकेवर प्रति:- महापालिका आयुक्त ,बृहन्मुंबई महानगरपालिका असा पत्ता लिहावा व महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांचे कार्यालयात नियत दिनांका दिवशी दुपारी 05.00 वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहचतील अशाप्रकारे पाठविण्याची व्यवस्था करावी.

सही/-
महाव्यवस्थापक
(देवनार पशुवधगृह)